वाङ्मयप्रकार पुरस्कार । **सानिया**

कथनात्म साहित्यात लक्षणीय अशी निर्मिती करूनही सानिया यांच्या कथेत
तोच-तोचपणा नाही. एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगण्याचा सोस नाही.
त्यांची प्रत्येक कथा नवा अनुभव वाचकाला देऊन जाते.
ही कथा तथाकथित स्त्रीप्रधान नाही, या कथांमधून प्रकटणारे अनुभवविश्व
समकालीन असले तरीही अनाकलनीय मानवी जगण्याचा शोध आणि जीवनातील
संगतीचा अन्वयार्थ लावण्याची प्रबळ प्रेरणा देते,
त्यामुळे सानिया यांची कथा एकसुरी होत नाही. समकालीन परिप्रेक्ष्यातही
ती मानवी नात्याचाच शोध घेते. वाङ्मय-प्रकाराचा विचार केल्यास सानिया यांनी
मराठी कथा निश्चितपणे समृद्ध केली असे म्हणता येते.



सानिया

# कथेत रेंगाळता येते, जास्त काही सापडते

कथा, लघुकादंबरी, प्रवासवर्णन, अनुवाद व वैचारिक लेखन करणाऱ्या सानिया यांची कथानिर्मिती केवळ स्त्रियांच्याच नव्हे, तर समग्र मराठी कथापरंपरेत गुणवान भर घालणारी आहे. त्यांच्या १२ संग्रहांतील जवळपास पावणेदोनशे कथांमुळे मराठी कथाविश्वाला आगळी परिमाणे प्राप्त झाली आहेत. गेल्या ४०-५० वर्षांत वेगाने बदलत गेलेल्या जीवनाबरोबर- विशेषतः स्त्रीजीवनाबरोबर- त्यांच्या कथेची वाटचाल समांतरपणे होत राहिली आहे. बदलत्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनातील स्थित्यंतरांचा आलेख त्यामधून स्वाभाविकपणे रेखाटला गेला आहे.

स्त्रीमधल्या सुप्त क्षमतांचा व अस्फुट सामर्थ्याचा वेध घेताना त्यांनी स्त्रीची सांकेतिक प्रतिमा आणि मानवी नातेसंबंधांमधली रूढ चाकोरी यांच्यापुढे प्रश्नचिन्हे उपस्थित केली आहेत. त्यांनी चित्रित केलेल्या स्त्रियांचे परस्परांशी असणारे बंधही स्त्रीच्या रूपदर्शनाच्या दृष्टीने पृथगात्म आहेत. आई-लेकी, बहिणी-बहिणी, मैत्रिणी, सासू-सून यांच्यातील नात्यांचे असंख्य पदर त्यांची कथा उलगडून दाखवते.

गेल्या १०-१५ वर्षांत झपाट्याने वाढलेल्या शहरीकरणामुळे, नैसर्गिक ऊर्जास्रोतांच्या ऱ्हासामुळे व हवामान बदलांमुळे उग्र होत चाललेले पाणीटंचाईचे आणि पर्यावरणाचे प्रश्नही त्यांनी सजगपणे आपल्या कथांमधून मांडले आहेत.

त्यांची कथा व्यक्तीच्या भाव-विचारविश्वाकडे लक्ष केंद्रित करणारी आहे. विचारांची उलट-सुलट द्वंद्वे झेलत, परिस्थितीशी दोन हात करत अखेरीस स्वतःला अभिप्रेत असणाऱ्या रस्त्यावरून शांतपणे पण ठामपणे 'वाटचाल' करत राहणे, हे त्यांच्या पात्रांना महत्त्वाचे वाटते.

वृत्तीगांभीर्याने लेखन करणाऱ्या सानिया यांचे कथालेखन आणि कथेतर लेखन या दोन्हींमधून एकात्म विचारदृष्टीचा आढळ होतो, तो मौलिक आहे. कथाबीजाचा विस्तार, कथार्थ सूचित करण्याचे सामर्थ्य आणि लेखिकेची गर्भित मूल्यदृष्टी यांचा विचार करता, त्यांचे कथालेखन वाङ्मयीन महत्तेच्या कसोटीवरही पूर्णतया उतरते.

त्यांचे १२ कथासंग्रह : शोध (१९८०), प्रतीती (१९८९), खिडक्या (१९८९), दिशा घराच्या (१९९१), ओळख (१९९२), भूमिका (१९९४), वलय

'स्व-शोधाची आंतरिक उर्मी' हे अगदी बरोबर आहे. तिने मला दहाव्या वर्षी कविता दाखवली आणि मग गोष्ट. मग या वाटेवरचा तो शोध अधिक गुंतागुंतीचा झाला. त्या अवकाशाला कवेत घेताना दीर्घ कथा आणि कादंबरीची वाट दिसली. जरी मी माझ्या शिक्षित, शहरी, मध्यमवर्गीय, सुखवस्तू स्त्रीबद्दल प्रामुख्याने लिहीत राहिले असे समजले जाते, तरी जगताना माझे एकंदरीत आकलन विस्तारत होते. या साऱ्यात आपले स्थान काय, हा प्रश्न सोबतीला होताच. अनेक कंगोरे दृष्टीला पडत होते. अधिक विशाल मानवी जाणिवांची ओळख होत होती. माझ्या पात्रांना पडणाऱ्या प्रश्नांत ती दिसते, असे मला वाटते. एकमेकांच्या वर्तणुकीतून बांधली जाणारी विविध नाती समता, न्याय, विवेकवाद यावर बेतलेली असावीत, असा आग्रह माझ्या लेखनातली स्त्री आणि पुरुष पात्रेही करतात.

(१९९५), परिमाण (१९९६), प्रयाण (१९९७), ओमियागे (२००५), अशी वेळ (२०१०), पुन्हा एकदा (२०१५), त्यानंतर (२००२), आपले आपण (२००३) तर गेली ४० वर्षे कथालेखन करणाऱ्या या लेखिकेची ही मुलाखत.

**प्रश्न** – तुमच्या व्यक्तिगत जडण-घडणीचा काळ कसा होता? आतापेक्षा वेगळ्या परिघात, वेगळ्या परिस्थितीत तुम्ही असता तर वेगळं लिहिलं असतं, असं वाटतं का?

– माझा जन्म एका स्वतंत्र वृत्तीच्या पुरोगामी घरात झाला. वडील इंजिनिअर. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा तो काळ. लोकांसाठी धरणे बांधून नेहरूंनी दिलेल्या 'हीच देशाची मंदिरे आहेत', 'या बांधणीला हातभार लावा' अशा हाकेला आपण 'ओ' देतो आहोत, अशी त्यांची समजूत होती. माझ्या आईची विचारसरणी मग त्यानुसार तयार झाली. वडिलांनी इतर कुणाचा दबाव मानला नाही. घरात मुलीच असूनही आमच्या कानांवर 'तू मुलगी आहेस म्हणून...' अशी वाक्ये कधीही पडली नाहीत. शिक्षण आणि पुढे काय करायचे, यावरच भर असे. लग्नाचा विषयही कधी चर्चेला नव्हता. बदलीच्या निमित्ताने महाराष्ट्रातल्या गावोगावी आम्ही राहिलो. वेगवेगळ्या शाळांत गेलो. सामान बांधायच्या तयारीत सतत असल्याने वस्तूंचे संग्रह केले नाहीत. त्याची आवडच निर्माण नाही झाली. विविध लोकांच्या समाजात वास्तव्य झाले. जात-उपजात-समाज-धर्म अशी विभागणी, त्यानुसार रीतीभाती, पद्धती असलेल्या गोष्टींचा आम्हाला खरोखर पत्ताच नव्हता.

नंतर स्वतःच्या जडण-घडणीचा विचार करताना या गोष्टी लक्षात आल्या. त्या काळात गृहीत धरल्या होत्या. आपण विशिष्ट स्तरात, विशिष्ट घरात, या आई-बापाच्या पोटी जन्म घेतल्याने किती गोष्टी आपल्याला विनासायास मिळत गेल्या याची तीव्र जाणीव झाली. आपली वाढ कुठल्या आचार-विचारपद्धतीत होते, त्यानुसार आपले व्यक्तिमत्त्व तयार होत जाते. आपला शोध त्यानुसार सुरू होतो. नंतर संधी जरूर येतात आणि बदल घडू शकतात. पण विनासायास मिळालेले काही केवळ जन्माच्या अपघाताने होते, याची लख्ख जाणीव झाली. त्याबरोबरीने ते ज्यांच्या वाट्याला येत नाही, त्यांची स्थिती कशी असू शकते आणि त्यांना कसला लढा द्यावा लागतो, तेही कळत गेले. विचारांचा प्रवाह सतत वाहता होता.

या आकलनामुळे यापेक्षा वेगळ्या परिघात- परिस्थितीत मी वाढले असते, तर वाढ निराळी झाली असती, समज-प्रश्न-शोध वेगळा झाला असता असेच वाटते.

**प्रश्न** – तुमची पहिली कथा १९६८ मध्ये 'श्री' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. त्यापूर्वी तुम्ही कविताही लिहीत होता. नंतर मात्र कथा हाच फॉर्म तुम्हाला जवळचा वाटला. याची कारणं आज मागे वळून पाहताना कोणती असावीत, असं वाटतं?

– कविता लिहायला अनेक वर्षं आवडायचं. मी लिहिल्याही पुष्कळ. पण कथा सापडली, तेव्हा हा आविष्कार खूप आवडला. कथेत एक गोष्ट असते. आपल्याला काही सापडलेले असते आणि काही प्रश्न पडलेले असतात. ते आपण आपल्या पात्रांकरवी शब्दांत मांडत जातो. ही प्रक्रियाच मला खूप आवडली. तिच्या शक्यता लक्षात आल्या. कविता बांधीव, उत्कट, त्या क्षणांची अशी वाटायची. कथेत रेंगाळता येते, जास्त काही सापडते हे उमजले. या कारणाने कथा हा माझा सर्वांत अधिक आवडता साहित्यप्रकार राहिला आहे. थोडक्या अवकाशात आयुष्याची-जगण्याची एक झलक दाखवता येते. तसे करणे आव्हानात्मक वाटते. दीर्घ लेखनात पुष्कळ जागा मिळते, हे खरे. तरीही चांगली कथा लिहिणे नक्की सोपे नाही. मला आठवते तसे त्या काळात मनात माणसे-प्रसंग-त्यांची नाती-त्यांचे प्रश्न असे सतत भरभरून उभे राहत असे. त्या साऱ्या गोष्टी कथेत मांडायला मन उतावीळ, तयारच असायचे.

**प्रश्न** – गेल्या ४० वर्षांतील स्त्री व तिचं जगणं आणि तुमची कथा समांतर वाटचाल करते. स्त्रियांमधली नाती तुम्हाला समजून घ्यायची-द्यायची आहेत. हा स्त्रीवादी विचारसरणीचा प्रभाव आहे, असं वाटतं का?

– स्वतः मुलगी असण्याचा काय अर्थ आहे? अशा तऱ्हेचा शोध प्रथमपासून होताच. आपली नाती, प्रेम, मैत्री इथपासून तो सुरू झाला. आई-बहीण-मैत्रीण या प्राथमिक नात्यांनी कुतूहल जागे केले. तो माझ्या आयुष्याचा महत्त्वपूर्ण भाग होता. सत्तरच्या दशकात मी तरुण स्त्री होते आणि स्त्रीवादी चळवळ भोवती घडत होती. तिने विचारांवर निश्चित परिणाम केला. मी ज्यावर विश्वास ठेवून होते त्याच गोष्टी म्हणजे स्त्रियांमधली परस्पर नाती, समजूत, मैत्र या स्त्रीवादाचा महत्त्वाचा भाग होत्या. म्हणजे

तसा अधिक परिणामही झाला आणि विश्वासही वाढला.

त्या सगळ्या परिवर्तनाची अधिक बाजू म्हणजे प्रश्न विचारायला सुरुवात केली. मुळात घरातल्या मोकळ्या वातावरणाने प्रश्न विचारायला शिकवलेच होते. वाचनाने ते अधिक पक्के केले. कुठलीही बाब– रीत, रूढी, परंपरा, नेम, नियम अशा नावाने येणारी– धार्मिक असो वा सामाजिक, मुकाट्याने ती तशी पाळली जाते म्हणून स्वीकारायची नाही याचे धडे गिरवले. नीट पृथ:करण करूनच ती अंगीकारायची, ही विवेकवादाची आणि बुद्धिवादाची पायरी होती. ती एकदा चढली की मागे फिरता येत नाही, पुढचे त्या प्रकाशात दिसायला लागते. माझ्यासारख्या दुसऱ्या, इतर स्त्रीचीही ती वाटचाल असणार; ती मी लेखनात मांडली. माझ्या दृष्टीने स्त्रीवाद या साऱ्यांना सामावून घेतो. स्त्रीचे असणे हे संवेदनशील, विवेकशील, सह–अनुभूतीपूर्ण– करुणामय असे माणूस बनत जाणे आहे.

**प्रश्न** – स्त्रीलेखक म्हणून अभिव्यक्तीवर दृश्य–अदृश्य दडपणे आली का कधी? किंवा आतली–बाहेरची? कसा काढला त्यातून मार्ग?

– सुरुवातीला तशी दडपणे कधी वाटलीच नाहीत. मी मुलगी आहे म्हणून अमुक एक लिहावे का, असा प्रश्नच पडला नाही. खरे कारण असेही होते की, मी लिहीत असलेले भोवतीचे कुणी वाचत नव्हते. त्या काळात मी महाराष्ट्रातच होते आणि मित्र–परिवार मराठी होता. तरीही घरी आणि बाहेर कुणी लेखनावर चर्चा केली नाही. त्या काळातच हे स्पष्ट उमगले की, मुळात लोक कमी वाचतात आणि जे वाचतात, ते आपल्या आजूबाजूला असत नाहीत. मग वास्तव्य महाराष्ट्राच्या बाहेरच राहिले. भोवतीची माणसे, घरातली आणि मित्रमंडळीही मराठी वाचणारी नव्हती. हे अधिकच सुलभ झाले. जणू लेखिका म्हणून माझे एक वेगळे व्यक्तिमत्त्व होते. त्यामुळे चर्चा–टीका– उलटसुलट प्रतिसाद यापासून मन चांगल्या अर्थाने उदासीन, दूर राहिले. त्याचा फायदा झाला.

आयुष्यात सुदैवाने लाभलेले आर्थिक स्थैर्य, त्यामुळे घेता आलेले निवडीचे अनेक निर्णय याचे भान जरूर होते; पण अभिव्यक्तीवर याखेरीज दुसरी कुठली दडपणे आली असे वाटत नाही. मनात हे ठामच होते की, आपल्याला आतून जे वाटते ते लिहायचेच. भोवतालची परिस्थिती न बोलता हुशारीने वळवून घ्यायची–लिहायची उर्मी आली की, शांतपणे वेळ–काळ न पाहता लिहायचे. आपला अग्रक्रम आपण ठरवायचा आणि निभावायचा. हे साधून गेले खरे. क्वचित कुणी काही असेल म्हटले, तर दुर्लक्ष केले. उत्तर द्यायला आपण बांधील नाही, असे ठरवून ठेवले होते. कोण काय म्हणते, हे कधी महत्त्वाचे वाटलेच नव्हते.

**प्रश्न** – कविता–कथा ते दीर्घ कथा–कादंबऱ्या असा बराच मोठा प्रवास झाला तुमचा. ज्या स्व–शोधाच्या आंतरिक उर्मीतून झाला त्या शोधाविषयी... काय सांगाल?

– 'स्व–शोधाची आंतरिक उर्मी' हे अगदी बरोबर आहे. तिने मला दहाव्या वर्षी कविता दाखवली आणि मग गोष्ट. मग या वाटेवरचा तो शोध अधिक गुंतागुंतीचा झाला. त्या अवकाशाला कवेत घेताना दीर्घ कथा आणि कादंबरीची वाट दिसली. जरी मी माझ्या शिक्षित, शहरी, मध्यमवर्गीय, सुखवस्तू स्त्रीबद्दल प्रामुख्याने लिहीत राहिले असे समजले जाते, तरी जगताना माझे एकंदरीत आकलन विस्तारत होते. या साऱ्यात आपले स्थान काय, हा प्रश्न सोबतीला होताच. अनेक कंगोरे दृष्टीला पडत होते. अधिक विशाल मानवी जाणिवांची ओळख होत होती. माझ्या पात्रांना पडणाऱ्या प्रश्नांत ती दिसते, असे मला वाटते. एकमेकांच्या वर्तणुकीतून बांधली जाणारी विविध नाती समता, न्याय, विवेकवाद यावर बेतलेली असावीत, असा आग्रह माझ्या लेखनातली स्त्री आणि पुरुष पात्रेही करतात. हा सतत उपस्थित असणारा धागा मला महत्त्वाचा वाटतो.

मी पुष्कळ वेगवेगळ्या शहरांत, गावांत, देशांत राहिले, खूप प्रवास केला, याचा मोठा वाटा माझ्या बनत गेलेल्या दृष्टिकोनात आहे. माझ्या लेखनातली माणसे फक्त मराठी नसतात. अनेकदा मी तसले तपशील मुद्दाम धूसर ठेवते, कारण मला अभिप्रेत असतात ती सगळीकडची माणसे. मग आयुष्याकडे आपण कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो, हा महत्त्वाचा भाग उरतो. तो विशाल करत विस्तारत नेला की उमजते, आपले हे इथले काही वर्षांचे आयुष्य अगदी नगण्य आहे. जन्माच्या एका अपघाताने आपण एका काळाशी आणि जागेशी जोडले गेलो आहोत. खरे जाणून घ्यायचे आहे ते हे की– या विश्वाच्या अफाट पसाऱ्यात मानवाचे स्थान ते काय आणि मानव म्हटला तरी केवळ काही लाखो वर्षांतले उत्क्रांत झालेले आपले जीवन.

शिवाय आपली सुरुवात तर एकाच ठिकाणाहून झालेली. म्हणजे आपण किती एकमेकांशी- भोवतीच्या निसर्गाशी, साऱ्या प्राणिमात्रांशी- अवघ्या विश्वाशीच पूर्ण जोडले गेलो आहोत. पण वर्तमानकाळ असा की सर्व प्रकारचे भेद, विशेषतः आपणच निर्माण केलेले, कृत्रिम- संपूर्ण मानवी संकल्पनेतून तयार केलेले- समाज, प्रदेश-देश, भाषा, धर्म, वंश, आर्थिक, सामाजिक वर्ग इत्यादी इत्यादी, तेच प्रमाण मानून, तीच आपली ओळख आहे असा अभिनिवेश घेऊन माणसे जगतात... हा किती वृथा आहे, हे मला जाणवलेले माझ्या शोधाचे सार.

**प्रश्न** – म्हणूनच का तुम्ही 'सानिया' हे अनेक भाषांमध्ये आढळणारे 'लेखकनाम' स्वीकारले?

**प्रश्न** – खरे आहे. लेखनाची सुरुवात करताना लहान वयातच मी 'सानिया' अशी एवढीच माझी ओळख करून दिली. जात, धर्म, प्रादेशिक अस्मिता- असल्या कुठल्याही नावाद्वारे करून दिल्या जाणाऱ्या आपोआप ओळखीपलीकडे जावे, अशी तीव्र इच्छा असल्यामुळे हे मुद्दाम, जाणीवपूर्वक केले. शिवाय बाईचे नाव तर पिता किंवा/ आणि पती यांच्याशी तिच्यावरचा 'मालकी हक्क' कुणाचा, अशा रूढीने जोडलेले. याला मला नकार द्यायचा होता. ही मी ठरवून, आंतरिक विश्वासाने केलेली कृती. ती 'किती सामाजिक' हे मला नंतर उमगले. हा विचार साहजिकपणे लेखनात उतरला.

**प्रश्न** – कथा रचणं, माणसं रचणं अशा शब्दसंहती तुम्ही अनेकदा वापरता. त्यातून तुम्हाला जाणीवपूर्वकता सुचवायची असते का? की निर्मिती, लेखन यासाठीच ते योजले जाते?

– आपण गोष्टी आणि माणसे रचत जातो, हे मी निर्मितीच्या अंगाने म्हटले आहे. आपण अनुभवले, विचार केला, काही सापडले, काही अनुत्तरित, धूसर राहिले- हे कसे व्यक्त करायचे? तर मनात त्या अनुषंगाने जी माणसे आणि प्रसंग दिसत राहतात, त्यांना आपण शब्दांत 'रचायचे'. पण म्हणजे ते जाणीवपूर्वक, योजून होत नाही. मनात ती एक गुंफण झालेली असते, ती अनिवार्यपणे जणू खरीच अशी जगली जाते. तो निर्मितीचा अपरिहार्य असा एक प्रवास असतो. कित्येकदा लिहितानाच दिसतो आणि चकित करून जातो.

माझ्या कथेतल्या अनेक पात्रांत स्वतःचा एखादा अंश असतोच. पण पूर्णपणे 'मी' त्यात नसते. लेखक म्हणून आपण शब्दांत लिहीत जातो ते असे नवं शोधत. जे माहीत आहे, वास्तवात आहे तेच नव्याने निर्माण करून सांगत जातो. ही ती महत्त्वाची निर्मिती प्रक्रिया.

**प्रश्न** – सध्याचा काळ- विशेषतः १९८५-९० नंतरचा काळ हा लेखक-कलावंतांनी सामाजिक वास्तवाचे दर्शन घडवावे(च) अशा जोरकस मागणीचा आहे. तुलनेने कलात्मकतेचे भान क्षीण आहे. तुम्ही कलात्मकतेसह तुमचे वास्तवाचे आकलन मांडत आला आहात. काय सांगाल याविषयी?

– आपण माणूस म्हणून एका विशिष्ट परिस्थितीत, परिघात जगत असतो. पण तरीही त्यापलीकडे काय चालले आहे, काय घडते आहे याचे भान आपण सजग असू तर असतेच. जसे- माझी घडण होताना आपल्या वाट्याला आलेले स्वातंत्र्य, घरातला मोकळेपणा सगळ्याच मुलींच्या वाट्याला येत नव्हता, हे मला कळत गेले. पण प्रतिकूल परिस्थितीशी कसा सामना करायचा, स्वतःचे आत्मभान कसे बांधायचे; विचारांच्या परिवर्तनाने, चळवळीने, कार्याने कसे बदल घडवून आणायचे हेही दिसत होतेच. माझ्या लेखनातली माणसे तसे करू पहात होती, एका विस्तारित समजुतीकडे प्रवास करण्याच्या प्रयत्नात होती. हे सामाजिक वास्तवाचे आकलनच आहे, असे मला वाटते. अमुक एकच परिस्थिती मांडली म्हणजेच ते सामाजिक दर्शन झाले, असा अट्टहास मला कधी पटला नाही.

**प्रश्न** – अस्मितांचे तळ शोधताना सध्या दिसणारे माणुसकीशून्य वर्तन... याविषयी काय वाटते?

– माणसांचे वर्तन हा एक अगम्य विषय आहे. साहित्यातून तोच तर शोध असतो लेखकाचा. माणसे अमुक एका रीतीने का वागतात? त्याचे परिणाम काय होतात? आपण समूहाने राहायला लागलो, काही संकल्पना बांधून समाज तयार केले, संस्कृतीनामक परिमाणे रचली गेली. यात आपण सलोखा, मैत्र, प्रेम, न्याय, सह-अनुभूती, परस्परसमजुती, इतरांना न दुखावणे, मदत करणे अशी अनेक मानवी मूल्ये महत्त्वाची मानली. कारण यांचा पाया असला की शांती-सुख-आनंद-समाधान सगळ्यांच्याच वाट्याला येते, असा अनुभव येतो. पण प्रत्यक्षात असे साधे-सरळ असत नाही. तसे कधी घडलेले नाही. थोडा काळ, काही थोड्यांच्या वाट्याला तसे येऊ शकते. मानवी स्वभाव

गुंतागुंतीचा आहेच, पण आधी म्हटलेल्या मूल्यांखेरीज इतरही बाजू असतात. माणसा-माणसातली असमानता, एकाने दुसऱ्याहून स्वतःला वरचढ मानणे, अनेक तऱ्हेची सत्ता निर्माण होणे- जी सामाजिक व्यवस्थेत अपरिहार्यतेने तयार होते, मग अधिकाराचा वापर, यातून मग शोषण आणि भीती यांचा शिरकाव होतो. माणसे लढतात, एकमेकांना मारतात, छळ करतात, गुलाम म्हणून क्रूरतेने वागवतात आणि युद्धाचेही गौरवीकरण होते.

समानता-न्याय-मैत्र हा जीवनाचा पाया असावा, असा विश्वास बाळगणाऱ्या मनांना मग क्लेश होतात. माणुसकीशून्य वर्तन हे आपोआप नैसर्गिक घडत नाही. त्याची कारणे शोधावी लागतात.

प्रश्न – आणि तीव्रपणे व तत्काळ होणारे प्रतिक्रियात्मक लेखन...?

– सध्याच्या प्रचंड वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगाचा तो एक परिणाम आहे. या जगाचे फायदे खूपच आहेत. आपले जगणेच बदलले आहे. सीमारेषा पुसट झाल्या आहेत. जग निश्चित जवळ आले आहे. सर्व क्षेत्रांत नवनवीन संशोधनाने अफाट शक्यता निर्माण केल्या आहेत. याबरोबरीने काही इतर परिणाम अपरिहार्य आहेत. म्हणून आपली निवड महत्त्वाची. ती शक्यतो अचूक, निर्दोष होण्यासाठी त्यासंबंधीचे शिक्षण जरुरीचे आहे. बदलत्या जगात या वेगाने टिकून राहायचे तर स्वतःला अधिक शिकवणे, नव्या गोष्टींना सामोरे जाणे, जुन्या टाकून देणे हे करावे लागते. तसे नाही करता आले की, आपण मागे पडल्याची तीव्र जाणीव होते. ती तशी होऊन, स्वीकारून आपल्याला काय हवे तेही ठरवता येऊ शकेल. पण पुन्हा हा सारा विवेकाचा समतोल मार्ग झाला. पण माणसे अनुसरतात सोपा मार्ग. स्वतःला केंद्र मानून 'सगळे माहीतच आहे' असा पवित्रा घेणे; कुठल्याही घटनेला तत्काळ, तीव्र, उथळ प्रतिसाद देणे हे त्यातून घडते.

आयुष्य आणि जग किती गुंतागुंतीचे आहे याची जाण असेल, तर एक मोठा पट कायम लक्षात येतो. निरनिराळे घटक एकमेकांवर किती आणि कसे परिणाम करत असतात, हे उमजलेले असते. पण 'माझे मत महत्त्वाचे आणि कायम बरोबरच' असा वृथा अभिमान असेल; तर 'मी लगेच प्रतिक्रिया दिलीच पाहिजे, कारण सगळे जग माझ्याभोवतीच फिरत आहे' अशी समजूत होणे साहजिकच.

अभ्यासाचे पाठबळ नसणारे असे तात्कालिक लेखन होत राहीलच, कारण ते सोपे आहे. तिकडे फारसे लक्ष न देणे, हा एकच उपाय. ते काळात विरून जाईल, अशी आशा.

प्रश्न – तुमच्या समुपदेशनाच्या कामाचा आणि लेखनाचा संबंध कसा जुळतो?

– तशी मी उशिराच समुपदेशनाच्या क्षेत्रात शिरले. मानसशास्त्राचे थोडेफार वाचन होते, पण रीतसर अभ्यास नव्हता. ती संधी मिळाली. शिकले, वाचन केले, प्रशिक्षण मिळाले आणि अनेक वर्षे स्वयंसेवी काम करत आले आहे. त्यात समाधान आहेच, पण मानवी वर्तणुकीचा अनुभव आणि निरीक्षण करायच्या संधी मिळतात. याने एक खूप मोठा, विशाल गुंतागुंतीचा पट पाहायला मिळतो. कुठल्याच मानवी स्वभावाचे, वागण्याचे, भावनांचे स्पष्टीकरण सरळ, एकमार्गी नसते. त्यात किती प्रकारच्या घटकांचे कार्य चालू असते, हे लक्षात येत गेले. हे माझ्या लेखनातल्या शोधाशी समांतरच होते. वर्तणुकीतल्या विसंगती, सामाजिक परिस्थिती, राजकीय वास्तव यांचे परस्परांशी असलेले संबंध कळल्यानंतर मूलभूत मानवी अधिकारांच्या कायद्याचा रीतसर अभ्यास केला. या इतर कामामुळे आणि अभ्यासामुळे लेखिका म्हणून आपले जे भान असते ते अधिक लख्ख होत जाते, हे खरे.

प्रश्न – प्रेमाचे जनुक किंवा दुष्काळ यांसारख्या तुमच्या कथांतील पात्रांच्या उक्ती-कृतीतून आणि कथार्थातूनही समकालीन वास्तवाचे भान अस्तरासारखे उपस्थित आहे. कथालेखनाचा हा पुढचा महत्त्वाचा टप्पा आहे. यापुढे दीर्घ लेखनाचा विचार आहे का?

प्रश्न – आत्तापर्यंत ठरवून काही नाही लिहिले. पण मनात काही सुरू असतेच आणि कुणी सांगावे- लिहिले जाईलही. इथपर्यंत येताना खूप काही शिकायला, अनुभवायला मिळाले आहे; ते सगळेच लेखनातून मांडता आलेले नाही, येत नाही याचीही जाणीव आहे. कधी तरी ते अजून न मांडता आलेले दिसायला लागेल आणि लिहू आपण, अशी आशा असतेच.

(संवादक : वंदना बोकील-कुलकर्णी
Mob. 9822033562)

**सानिया,** बंगळुरु
Mob 9901843265
saniya1011@gmail.com